Literacy for a Billion

Movie: Aamchya Sarkhe Aamhich
Year: 1990

Song: Ratra Aahe Reshmachi
Lyricist: Pravin Davane

रात्र आहे रेशमाची ये ना
चांदणे हे बाहूपाशी घे ना
रात्र आहे रेशमाची ये ना
चांदणे हे बाहूपाशी घे ना
का तुला कळेना
ही नशा चढेना
क्षण झाले शराबी हे
तू ये ना माझ्या सजणा
हो ये ना माझा हो ना

हे दिवे शांत झाले
देहीत ते जागले रे
हे दिवे शांत झाले
देहीत ते जागले रे
हे नवा भोवरा हा
वेढी तनाला मनाला
दे प्रिया किनारा
हवासा निवारा
रे निशा पुकारी ही
तू ये ना माझ्या सजणा
हो ये ना माझा हो ना

रात्र आहे रेशमाची ये ना

देही आग वेडी
घे रान पेटून देही
देही आग वेडी
घे रान पेटून देही
या इथे ना कुणीही
जागेल तेव्हा कळीही
ही झुरे कधीचे
शहारे फुलाचे
रे झाले अधीर मी
तू ये ना माझ्या सजणा
हो ये ना माझा हो ना
रात्र आहे रेशमाची ये ना
चांदणे हे बाहूपाशी घे ना
का तुला कळेना
ही नशा चढेना
क्षण झाले शराबी हे
तू ये ना माझ्या सजणा
हो ये ना माझा हो ना

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*